


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार २७ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये




# त्या शिक्षकांना सेवेतून कमी करणार-दीपक केसरकर


शिक्षणाचा दर्जा न सांभाळणाऱ्या शिक्षकांना आधी ६ महिने प्रशिक्षण देणार. त्यातूनही दर्जा सुधारला नाही तर अशा शिक्षकांचा ५० टक्के पगार कापणार. तरीही दर्जा सुधारला नाही तर सेवेतून कमी करणार असं शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं आहे. पुण्यात आयोजित एका वृत्तवाहिनीच्या शिक्षण परिषदेत ते बोलत होते. शिक्षण क्षेत्रातल्या सर्व शिक्षक, अधिकाऱ्यांना फिल्डवर उतरून दर्जात्मक शिक्षण द्यावं लागणार असंही त्यांनी स्पष्ट केलं. दीपक केसरकर काय म्हणाले? "शिक्षक समाधानी असतील तरच ते विद्यार्थ्यांना गुणात्मक शिक्षण देऊ शकतील. पुढील काळात शिक्षण क्षेत्रातल्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण अधिकारी,



डेप्युटी डायरेक्टर सर्वांना फिल्डवर उतरून दर्जात्मक शिक्षण द्यावं लागणार आहे. आठवीपर्यंत परीक्षा नाही यामुळे मुलं निर्धास्त राहतात. त्याला गणित, विज्ञान, इंग्रजी येतं की नाही याची चिंता कोणी करत नाही. यापुढे शिक्षकांना ही मुभा राहणार नाही. अनेक शिक्षकांना लाख, सव्वा लाख पगार असतो. मग मुलांची जबाबदारी त्यांच्यावर आहे. आतापर्यंत ही जबाबदारी ठरवण्यात आली नव्हती," असं दीपक केसरकर यांनी सांगितलं. पुढे ते म्हणाले की, "मी असंदेखील सर्क्युलर काढलं आहे की, ज्या शिक्षकांना शिकवता येत नसेल त्यांना ६ महिने पूर्ण पगार देऊन प्रशिक्षण दिलं जाईल. त्यानंतरही बदल झाला नाही तर ५० टक्के पगार कमी करणार आणि तरीही बदल झाला नाही तर सेवेतून दूर करणार. सेवेतून दूर करणं हेतू नाही. मुलांचं शिक्षण हे शिक्षण खात्याचं अंतिम उद्दिष्ट होतं. आतापर्यंत हे शिक्षण नाही तर शिक्षक खातं होतं. त्यांच्या समस्या घेऊन सरकारकडे जात होते. त्यांच्या समस्या वर्षभरात सोडवण्यात आल्या आहेत. शिक्षकानं एकाच ठिकाणी राहून शिक्षणाचं काम कर्म करावं. शिक्षणाचा दर्जा वाढवण्यावर भर, जे शिक्षक यात कमी पडतील त्यांच्यावर कारवाई करणार". जर्मनीशी मनुष्यबळ पुरवण्यासाठी करार कोणत्याही पालकमंत्र्यांनी आपल्या सिस्टर सिटीचा उपयोग महाराष्ट्रासाठी झाला पाहिजे असा विचार केला नाही अशी खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली. जर्मनीतील बाडेन-वुर्टेमबर्ग हे दुसरं सर्वात श्रीमंत राज्य आहे. त्यांना ५ लाख तरुणांची गरज असून, आम्ही ४ लाखांचं टार्गेट घेतलं. पहिल्या १० हजार मुलांना प्रशिक्षण दिलं जात आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बदलणारा हा निर्णय आहे. साधा वायरमन जरी जर्मनीत गेला तर त्याला वर्षाला ३० लाख असेल, जो स्वप्नातही विचार करु शकत नाही. नर्सेसला वर्षाला ३६ पगार मिळेल असं दीपक केसरकर यांनी सांगितलं. "इंग्रजी ही कधीही जगाची भाषा नव्हती आणि नसणार आहे. इंग्रजी ही फक्त आंतरराष्ट्रीय स्तरावर संवादासाठी वापरली जाणारी भाषा आहे. प्रत्येक देशाला स्वतची भाषा असते. त्या देशातील सर्व व्यवहार त्या भाषेत चालतात. जर या मुलांना जर्मन भाषा शिकवली नाही तर ही मुलं जर्मनीत जाऊ शकत नाही. त्याचं प्रशिक्षण सध्या सुरु आहे. शासकीय नोकरीत आरक्षण हवं म्हणून महाराष्ट्र पेटवायचा आणि किती संधी आहे हे युवकापर्यंत पोहोचवायचं नाही हा विरोधाभास आहे," असं ते म्हणाले. "सीबीएसई आणि आपल्या बोर्डात काही फरक नाही. आपला अभ्यासक्रम त्यांच्या तुलनेचा आहे.

## इच्छुकांनी जादुटोणा विरोधी समितीवर सामील व्हावी

बीड, दि. 26, : बीड जिल्ह्यातील इच्छुकांनी जादुटोणा विरोधी समितीवर सामील व्हावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी केले आहे



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय अन्वये जिल्हा स्तरावरील जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार व प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती गठित निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर समितीमध्ये जिल्हा समन्वयक म्हणून सदस्य निवड करणेकरीता जादुटोणा विरोधी काम करणाऱ्या इच्छुक सदस्यांनी जादुटोणा विरोधी काम करत असलेबाबतच्या पुराव्यासह आपला अर्ज दिनांक 15 ऑगस्ट 24 पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड कार्यालयास सादर करावेत असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड यांनी केले आहे.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात एक पेड माँ के नाम अभियानाचा शुभारंभ

**माजलगाव प्रतिनिधी दिनांक २६/०७/२०२४**

केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या एक पेड मॉ के नाम महावृक्षलागवड योजनेचा शुभारंभ श्री सिद्धेश्वर महाविद्यालयांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांच्या हस्ते करण्यात आला. या अभियानांतर्गत एक स्वयंसेवक तीन वृक्ष या संकल्पनेनुसार 900 वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला. या शुभारंभ प्रसंगी महाविद्यालय परिसरात 82 रोपांची लागवड करण्यात आली. हे अभियान 31 जुलै पर्यंत चालू राहणार असून या अभियानांतर्गत दत्तक गाव जायकोची वाडी, विवेकग्राम मंजरथ , नाखलगाव व महामार्गाच्या दुतर्फा वृक्ष रोपांची लागवड करण्यात येणार आहे. या वृक्षारोपण प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रेम राठोड, डॉ. विकास बोरगावकर यांची उपस्थिती होती. या अभियानामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी वृक्षारोपणाची गरज व पर्यावरण संरक्षण याचे महत्त्व विशद केले.

## धनगर (ST)आरक्षण या संदर्भात लवकरच मुख्यमंत्र्याची भेट घेणार: बाळासाहेब सोलंकर

### २०१४ ला डोंगराच्या कपारात , उन्हातान्हात , शेळ्या मेंढ्या मागं फिरणाऱ्या जमातीला फडणवीस साहेब तुम्ही त्यावेळी आश्वासन दिलं होतं त्याचं काय झालं ?

**बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी**

गेल्या अनेक दिवसापासून जनतेला प्रत्येक सरकार संभ्रम अवस्था टाकून जनतेमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. . याच्या मुळाशी कोण आहे. हे जनतेने शोधलं पाहिजे. आज धनगर समाजामध्ये डोंगर, दर्यामध्ये , अत्यंत बिकट परिस्थिती कुठलंही उत्पन्न, शिक्षण नसलेले तरुण



तरुणी शेळ्या मेंढ्या मागं वन - वन फिरतात. आज एक वेगळ्या वळणावर जाऊन देशोधडीला लागले. या धनगर आरक्षणासंदर्भात आगामी काळात मुख्यमंत्र्यांशी भेट घेऊन समाजाला न्याय भेटला पाहिजे. समाजामध्ये खूप गरीब काही कुटुंब आहेत.त्यांच्या मुलाला प्रशासकीय, राजकीय सामाजिक ,ओघात आणायचा असेल तर त्यांना आरक्षण दिलं पाहिजे. आरक्षणाच्या माध्यमातूनच या समाजाची उन्नती होऊ शकते हे तमाम महाराष्ट्रातल्या जनतेला समजलेला आहे. धनगर समाजाचा एसटी मध्ये ताल्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. अशी आमची मागणी राहील. आणि ही मागणी घेऊनच आम्हीं मंत्रालयामध्ये जाऊन मुख्यमंत्र्यांशी भेट घेणार आहोत. माहिती जनसेवक बाळासाहेब सोलंकर यांनी दिली आहे.

## धनादेश अनादर प्रकरणी प्रशांत शिंदे यांची निर्दोष मुक्तता

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

३ लाख रुपयांचा धनादेश न वटल्याच्या कारणाहून येथील मोबाईल व्यवसायिक प्रशांत शिंदे यांची न्यायालयाने सबळ पुराव्या अभावे निर्दोष मुक्तता केली.



या विषयी सविस्तर वृत्त असे की अंबाजोगाई शहरातील मोबाईल व्यवसायिक प्रशांत चंद्रकांत शिंदे यांनी तक्रारदार कल्याण लोमटे यांच्या कडुन ३ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. ते कर्ज परतफेड करण्यासाठी प्रशांत शिंदे यांनी कल्याण लोमटे यास धनादेश दिला होता सदर धनादेश बँकेत न वठल्या मुळे कल्याण लोमटे यांनी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी वर्ग २ यांच्या कडे एस एस सी क्रमांक १५०/२०२२ अन्वये फिर्याद दाखल केली या प्रकरणी घेण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी फिर्यादी पक्षाने साक्षीदार व पुरावे दाखल केले मात्र त्यानंतर आरोपीचे वकील ॲड अमित गिरवलकर यांचा युक्तिवाद व सादर केलेला पुरावा ग्राह्य धरून मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी क्र. २ श्री. शेख.बी.पाटील साहेब यांनी दिनांक २४ जुलै २०२४ रोजी सबळ पुराव्या अभावी प्रशांत शिंदे यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड.अमित गिरवलकर यांनी काम पाहिले त्यांना ॲड.गुंडाप्पा बुरकुले , ॲड.नितीन जाधव, ॲड,राजकुमार चौरे यांनी सहकार्य केले.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबा राजुरी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बबन पवार सर यांची निवड

**पाटोदा: प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील तांबा राजुरी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते या पालक सभेच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे मावळते अध्यक्ष संतोष तांबे हे होते. या पालक सभेचे प्रास्ताविक सोंडगे सर यांनी केले या पालक सभेमध्ये शालेय समितीचे पुनर्गठण, शालेय उपक्रमाचे आयोजन आदी विषयांवर चर्चा करण्यात आली व शालेय व्यवस्थापन समितीची नव्याने निवड करण्यात आली. सर्व पालकांच्या सर्वानुमताने बबन पवार सर यांची शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर अनिल तांबे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. निकिता कदम, सुरेखा भंडारे, केशव तांबे, आशा नेमाने, स्वाती तांबे, लक्ष्मण तांबे सर, चंद्रकांत तांबे (ग्रा पं सदस्य) यांची शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्य म्हणून निवड करण्यात आली.



यावेळी पालकांनी प्रचंड उत्स्फूर्तपणे उपस्थिती दर्शवली. महिला पालकांची ही उपस्थिती होती . या पालक सभेमध्ये निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा तांबाराजुरी पाटोदा तालुक्यातील नावाजलेली शाळा होती, या शाळेचे गतवैभव पुन्हा प्राप्त करणे माझे उद्दिष्ट असून शाळेमध्ये मागील दोन वर्षापासून विविध उपक्रम राबविले जातात आणि यापुढेही राबविले जातील व गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणार असे मत शालेय व्यवस्थापन समिती चे नवनियुक्त अध्यक्ष बबन पवार सर यांनी मांडले. पालक सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

# केजमध्ये रमेश गालफाडे घेणार जनसंवाद मेळावा ! मतदारसंघातील महिला-पुरुष मेळाव्यास राहणार

**पैठण/चैताली औटे**

पैठणच्या आगारात अजूनही जुन्याच बसेस रस्त्यावर प्रवाशांना घेऊन धावत असून यामुळे प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा होताना दिसून येत आहे.यामुळे प्रवाशात मोठा संताप व्यक्त केला जात आहे.त्यातच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस प्रवासात परिवहन मंत्रालयाने महिला, जेष्ठ नागरिकांना विनामूल्य प्रवास योजना सुरू केली.तसेच प्राथमिक शाळा ते महाविद्यालय आणि विद्यापीठ यांच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवासात विशेष सवलत देण्यात आली असल्याने आता बसच्या प्रवासात मोठ्या प्रमाणात भर पडली असून प्रवाशी संख्या वाढली आहे आणि बसेसच्या फेऱ्या देखील वाढल्या आहेत.

त्यामुळे बससेवा अद्यावत असली पाहिजे अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.पैठण बसआगारात कालबाह्य बस गाड्या अत्यंत जीर्ण झालेल्या आहेत. या बस गाड्या लांब पल्याच्या ठिकाणी पाठविल्या जातात परंतु पैठणून निघालेली बस गाडी नियोजित स्थळी पोहोचते की नाही व तेथून परत येते की नाही याची शाश्वती नसते. दररोज पैठण संभाजीनगर ,पैठण पाचोड, पैठण शहागड, पैठण शेवगाव या रोडवर पैठण आगाराच्या



बस गाड्या नादुरुस्त झाल्याने रस्त्यावर उभे असल्याचे चित्र दिसत आहेत. काही दिवसांपूर्वीच पुण्याहून पैठण येथे बस स्थानकात बस पोहोचल्याबरोबर



बसचे टायर फुटले होते तसेच पंढरपूर येथून वारकरी भाविक घेऊन निघालेली बस पैठण मध्ये येतात बस स्थानक समोरच वळण घेत असताना बंद पडल्याची घटना घडली होती. दुरुस्तीसाठी लागणारे साहित्याची कमतरता

पैठण आगाराच्या नादुरुस्त असलेल्या बस गाड्या दुरुस्त करण्यासाठी साहित्याची, ऑइल ची कमतरता आहे. या ठिकाणी असलेल्या मेकॅनिकल विभागाचे कर्मचारी धकाधकी करून बस गाड्या दुरुस्त करून देतात.पैठण आगारातून वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे साहित्याची मागणी केली असता कमी प्रमाणात साहित्य पाठवले जाते ही मोठी शोकांतिका आहे. पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष

पैठण बस आगारासाठी नवीन बस गाड्या उपलब्ध करून देण्यासाठी पालकमंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली होती. परंतु त्यांनीही याकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसत आहे.पैठण येथे पाच वर्षापूर्वी रोजगार हमी मंत्री संदीपान भुमरे यांच्या हस्ते गाजावाजा करून सुरू केलेल्या शिवशाही बस सुद्धा नादुरुस्त अवस्थेत आहे. शिवशाही बस ना दुरुस्त झाल्यास त्यांचे पार्ट संभाजीनगर येथे उपलब्ध होत नाही. त्यामुळे या गाड्यांची दुरुस्त करण्यासाठी पुणे येथे न्यावे लागते त्यामुळे या गाड्या लांब पल्ल्याच्या ठिकाणी पाठवल्या जात नाहीत.

## सरकारने आरक्षणाचा प्रश्न सोडवावा-खा.सौ रजनीताई पाटील

### (मराठा,धनगर, मुस्लिम आरक्षणासाठी खा.रजनीताई संसदेत आक्रमक

केज/प्रतिनिधी

कॉंग्रेसचा खासदार ज्येष्ठ नेत्या,राज्यसभेच्या खा रजनीताई अशोकराव पाटील संसदपटू म्हणून राज्यसभेत प्रश्न मांडत असतात. मराठा आरक्षण, मुस्लिम आरक्षण धनगर आरक्षण प्रश्नावर सरकारने तात्काळ तोडगा काढावा,समाजाला न्याय द्यावा ही मागणी आक्रमक होऊन मांडली. संसदेत मराठमोळा आवाज बुलंद झाला. मागणीसाठी सर्व समाज आंदोलन,उपोषण करत आहेत त्याकडे दुर्लक्ष करू नये हे सांगून सरकारला या प्रश्नावर निरुत्तर केले. खा पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारला धारेवर धरले. सरकारला धारेवर धरणाऱ्या कॉंग्रेसच्या प्रभावी महिला नेत्या म्हणून त्यांचे नाव आहे. काल संसदेत मराठीतून भाषण करत राज्यात सुरू असलेल्या आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारची त्यांनी कानउघडणी केली. खा पाटील या नेहमीच अभ्यासूपणे शेतकरी उपेक्षित वंचित घटकांसाठी आवाज उठवत असतात. आरक्षणाच्या प्रश्नावर आवाज बुलंद केल्याबद्दल तीनही समाजाकडून समाधान व्यक्त केले आहे.




## धीम्या गतीने रस्त्याचे काम; प्रवाशांचे बेहाल

### रस्त्याचे काम तात्काळ करण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार)पक्षाची मागणी

केज :- प्रतिनिधी

केज ते कानडीमाळी रस्त्याचे काम सुरु असून हे काम अत्यंत धीम्या गतीने व निकृष्ठ दर्जाचे होत असल्याने लोकांना रहदारी साठी नाहक त्रास होत आहे.त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की,केज



ते कानडीमाळी रस्त्याच्या कामासाठी रस्ता खोदल्यामुळे नालीतील पाण्यामुळे व पावसामुळे रस्त्यावर पूर्णपणे चिखल झाल्याने रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे.लहान वाहनधारक घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे.तसेच ये जा करणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.त्यामुळे या रस्त्याची एक बाजू प्रवासासाठी खुली करावी अन्यथा खा.बजरंग बाप्पा सोनवणे व मा. आ. पृथ्वीराज साठे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाव्दारे दिला आहे.

निवेदनावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार युवक तालुकाध्यक्ष कैलास चाळक,शहराध्यक्ष इमाद फरोकी, विष्णू पाटील,दीपक राऊत,ऋषीकेश जाधव,मेटे सुरेश, यश काळे,मोहम्मद हरणमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## केजमध्ये रमेश गालफाडे घेणार जनसंवाद मेळावा !

### मतदारसंघातील महिला-पुरुष मेळाव्यास राहणार उपस्थित

**केज/प्रतिनिधी**

ऑक्टोंबर महिन्यात विधानसभा निवडणूक होणार असून सर्वच उमेदवार तयारीला लागलेले आहे.रमेश गालफाडे यांनी केज विधानसभेची निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे.त्यांनी मतदारसंघामध्ये संपर्क वाढविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू करून गावभेटीवर भर देण्याचे काम सुरू केले आहे. व सामान्य जनतेशी संवाद साधत आहे.यामुळे जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. येत्या ऑक्टोंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुकळे जाणार असून त्या पार्श्वभूमीवर गालफाडे यांनी जनसंपर्क वाढवला आहे.गालफाडे



यांनी मतदार संघात गावभेटीवर जोर लावला आहे.केज विधानसभेसाठी तिकीट मिळवण्यासाठी रमेश गालफाडे यांनी पूर्ण ताकद लावली असल्याचे समजले जाते.मुबई,पुणे येथे काही मोठ्या राजकीय नेत्यांची भेट घेऊन केज विधानसभा संदर्भात चर्चा केल्याची देखील मतदारसंघात जोरदार चर्चा सुरू आहे.रमेश गालफाडे गेल्या अनेक दिवसापासून केज-अंबाजोगाई मतदार संघात मतदार बांधवाच्या भेटी गाठी घेताना दिसत आहेत.निवढणूक लढवण्यासाठी गालफाडे सज्ज आहेत,त्यांना मतदार संघात ठिकठिकाणी चांगला प्रतिसाद मिळत आहे. रमेश गालफाडे यांनी मतदारसंघातील जनतेसाठी "जनसंवाद मेळावा' दि.३० जुलै २०२४ रोजी मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे ठेवण्यात आला आहे.या जनसंवाद मेळाव्याची जयंत तयारी करण्यात येत आहे. या मेळाव्यासाठी मतदारसंघातील जनतेनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रमेश गालफाडे मित्र परिवाराकडून करण्यात आले आहे.

## महिती अधिकार कार्यकर्ता महासंघ बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी सुदेश दादा सिरसट यांची निवड.

**केज/प्रतिनिधी**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष बसवेकर , कार्याध्यक्ष शेखर कोलते यांच्या आदेशाने तसेच माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अजय भांगे, बीड जिल्हा कार्यध्यक्ष नितीन ढाकणे उपाध्यक्ष अँड. हरिभाऊ घाईतिडक, बीड जिल्हा



मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे सरचिटणीस मुबशीर खतीब यांच्या मार्गदर्शनाखाली सुदेश दादा सिरसट यांची बीड जिल्हा उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या निवडी नंतर सुदेश सिरसट यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, माहिती अधिकार फेरडेशनची संपूर्ण नियम अटी व आचारसंहिता यांचे काटेकोरपणे पालन करून या पदावर जबाबदारीने काम करीन या पदाचा कुठलाही गैर वापर करणार नाही सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत व्यक्त केले आहे. या निवडीनंतर केज तालुक्यातील मित्र परिवारा कडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



पुण्यातील सिंहगड रोडवर असणाऱ्या अनेक सोसायटींमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांवर मोठं संकट कोसळलं आहे. अतिवृष्टीमुळे शेकडो नागरिकांचे संसार उद्धस्त झाले आहेत. अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. शेकडो वाहनांचं नुकसान झालं आहे. लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे अनेक महिलांनी हंबरडा फोडला आहे. या परिसरात अद्यापही वीज सुरु झालेली नाही. याशिवाय सोसायट्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांमध्ये गाळ भरला आहे. त्या अद्यापही स्वच्छ झालेल्या नाहीत. त्यामुळे नागरीक खूप हतबल आहेत. या नागरिकांच्या घरातील सर्व सामानाचं नुकसान झालं आहे. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्यातील इतर नागरिकांना नुकसानग्रस्त भागातील नागरिकांना मदतीचं आवाहन केलं आहे.

## रोज झाडाखाली आणि पाऊस आल्यावर गोठ्यात भरते शाळा ; वंजारवाडी वस्तीशाळेला १० वर्षांपासून इमारतच नाही ; शिक्षण विभागाचे दुर्लक्ष:- डॉ.गणेश ढवळे

बीड/**प्रतिनिधी**

बीड:- ( दि.२६ ) वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळे अंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांना गेल्या १० वर्षांपासून इमारतच नाही. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची उभारणी केली होती.दोन महिन्यांपूर्वी झालेल्या वादळवा-यात पत्र्याचे शेड उडुन गेले त्यामुळे आता विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे. मात्र पाऊस आल्यावर गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत असल्याने वस्तीवरील पालकांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. या शाळेसाठी निदान एका खोलीसाठी निधी देऊन तातडीने बांधकाम करून विद्यार्थ्यांच्या पायाभुत शिक्षणाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना केली आहे.

सविस्तर माहितीस्तव

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शिवारात बाहेगव्हाण शाळे अंतर्गत वंजारवाडी वस्ती येथे १० वर्षांपूर्वी जिल्हा परिषद वस्तीशाळेची स्थापना झाली.शाळा स्थापनेनंतर काही दिवसांनी वस्तीवरील ग्रामस्थांनी एकत्र येत वर्गणी गोळा करून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची खोली बनवली याच पत्र्याच्या शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत होते.परंतु दोन महिन्यांपूर्वी आलेल्या वादळ वा-यामध्ये पत्र्याचे शेड उडाले.त्यामुळे विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे.वंजारवाडी वस्ती येथे इयत्ता



१ ते ५ वी पर्यंतचे वर्ग आहेत.सध्या विद्यार्थी पटसंख्या २३ असुन दोन शिक्षक कार्यरत आहेत.शाळेच्या स्थापनेपासून इमारतीची मागणी होत असताना देखील अद्याप शाळेला ईमारत मिळाली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना कधी झाडाखाली तर कधी गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत आहे.शिक्षण विभाग आणखीन किती दिवस या शाळेकडे दुर्लक्ष करणार आहे. असा संतप्त सवाल वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांचे पालक करत आहेत. जोरदार वारा आणि पाऊस आल्यावर विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे पालकांची शाळा इमारतीची मागणी आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षणाचा प्रश्न; शिक्षण विभागाचे दुर्लक्ष:- डॉ.गणेश ढवळे

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेसाठी ईमारत , शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, डिजिटल शिक्षणासाठी विज आदि.मुलभूत सुविधा नाहीत.इमारत नसल्याने शाळेचे शैक्षणिक रेकॉर्ड तसेच विद्यार्थ्यांसाठी मधल्या सुट्टीमध्ये मिळणाऱ्या पोषण आहाराचे साहित्य ठेवण्यास अडचणीत महत्त्वाचे कागदपत्र आणि साहित्य ठेवण्याचे अडचणी आहेत.शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही भौतिक सुविधा नाहीत.याकडे वारंवार निवेदन तसेच आंदोलनाद्वारे शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून सुद्धा शिक्षण विभागाकडून उपाययोजना होताना दिसत नाहीत.एकदरीतच शिक्षण विभागाला याचे गांभीर्य दिसून येत नाही.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात मिल रोलर पूजन कार्यक्रम संपन्न..







**माजलगाव प्रतिनिधी**

माजलगाव दि २५ (बातमीदार) येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात गळीत हंगाम २०२४-२५ करीना मिल रोलरचे पूजन कारखान्याचे मा. चेअरमन साहेब श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांचे हस्ते काल दि २५ जुलै २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता विधिवत पूजनाने संपन्न झाले. गळीत हंगाम २०२४-२५ सुरु करणेच्या दृष्टीकोणातुन कारखाना, आसवणी प्रकल्प व को.जन प्रकल्पाकडील ओव्हरऑयलींगची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचबरोबर ऊस तोडणी वहातुकीचे कराराचे कामही अंतीम टप्यात आहे. कारखान्याचे संस्थापक स्व. सुंदररावजी सोळंके साहेब यांच्या कृपाशिर्वादाने तसेच कारखान्याचे मार्गदर्शक माआ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब, उपाध्यक्ष साखर संघ, मा.श्री. धेर्यशीलकाका सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री. जयसिंगभैय्या सोळंके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रगतीपथावर आहे. आगामी गळीत हंगामासाठी संचालक मंडळाने ६.५० लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ ठेवलेले असुन त्यासाठी कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, विगर सभासद ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला ऊस कारखान्यास गळीतास देवुन सहकार्य करणेचे आवाहन कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांनी केले. या कार्यक्रमास कारखान्याचे संचालक मंडळासह कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. आर.सी. बडगुजर, श्री.डी.एम.वरे जनरल मॅनेजर, श्री.एस.के.तौर वर्क्स मॅनेजर यांच्यासह सर्व खातेप्रमुख उपखातेप्रमुख, कर्मचारी व कामगार उपस्थीत होते.

## पुण्यातील घरांमध्ये शिरलेला गाळ, चिखल दूर करण्यासाठी युद्धपातळीवर मोहिम हाती घ्यावी-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### साफसफाई करणाऱ्या खासगी कंपन्यांची मदत घ्यावी नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**पुणे/पंकज भंडारी**

पुणे शहर आणि परिसरात काल झालेल्या अतिवृष्टीमुळे सिंहगड रोड, संचायनी पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने चिखल आणि घाणीचे साम्राज्य पसरले. या घरांमधील चिखल, गाळ आणि कचऱ्याची महापालिका तसेच साफसफाई करणाऱ्या खासगी कंपन्याच्या मदतीने युद्धपातळीवर स्वच्छता मोहिम राबवावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. पुरामुळे घरांचे, शेतीचे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सुचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत. पुण्यातील सिंहगड रोड, संचयनी पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरामध्ये चिखल शिरला आहे. त्यामुळे याभागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून त्याची त्वरित दखल मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी घेतली असून जिल्हा प्रशासनाला डीप क्लीन मोहिम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. घरांमध्ये शिरलेल्या पुराच्या पाण्यामुळे झालेला चिखल साफ करण्यासाठी सुमित इंटरप्राईजेस आणि बीव्हीजी या खासगी स्वच्छता कंपन्यांची मदत घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाची दखल घेऊन सुमित कंपनी ५०० स्वच्छता कर्मचारी आणि बीव्हीजी कंपनी १०० सफाई कर्मचारी उपलब्ध करून देणार असून त्यांच्या माध्यमातून घरांमधील चिखल काढून साफसफाई करण्यात यावी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुराचे पाणी, चिखल यामुळे परीसरात रोगराई पसरू नये यासाठी महापालिका प्रशासनाने औषधांची फवारणी करावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत.

## आष्टी तालुक्यातील रोजगार हमी योजनेचे बोगस कामाची चौकशी करावी.-रवीकाका ढोबळे

आष्टी/किरण जावळे

आष्टी तालुक्यामध्ये रोजगार हमीचे कामे अद्याप सुरू असून ते कामे पूर्ण होत नसून अद्याप कसल्याही प्रकारची कामे झालेली नाही तसेच ते काम पूर्ण झाले असल्याचे सांगण्यात येते व बोगस मस्टर उचलण्यात आले. तहसील आष्टी कार्यालय व संबंधित गुत्तेदार यांची आर्थिक देवाण घेवान चालू आहे असे समजत आहे . तरी शासनाचा कोट्यावधी रुपये खर्च होऊन सुद्धा आजही वस्ती रस्ते पानंद रस्ते पेवर ब्लॉक बसविणे ही सर्व कामे अपूर्ण शासनाचे जे धोरण आहे ते अपयशी ठरत आहे शेतकऱ्यांची जी अडचण आहे ती जशाच तशी आहे. तरी रोजगार हमी योजनेचे कामे पूर्ण होण्याअगोदर



पूर्ण बिल उचलले जात आहे. आष्टी तालुक्यामध्ये जे रोजगार हमी योजनेचे कामे अद्यापही पूर्ण झालेली नाही त्या कामाचे पूर्णपणे चौकशी करण्यात यावी. तरी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांनी याची चौकशी करून दोषीवर कार्यवाही .करावी अशी मागणी रवी काका ढोबळे राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी यांनी केली आहे.यावेळी उपस्थित आदिनाथ महाडीक,काकासाहेब कर्डीले,प्रविण चितळे, नवसे पाटील,दिलीप पाटील, रमेश पाटील,अरूणराव काकडे,राजु डावकर,आदि कॉग्रेस पदधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ॲक्शन मोडवर त्या लोकांवर होणार कठोर कारवाई

**विशेष /प्रतिनिधी**

“दूध आणि दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी एमपीडीएपेक्षाही कठोर असा राज्याचा स्वतंत्र कायदा करावा लागेल. तसेच अन्न पदार्थातील भेसळखोरांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल व्हावा यासाठी केंद्राला शिफारस करण्यात येईल”, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. राज्यातील दुधातील भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्त मोहीम प्रभावीपणे राबवून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी व्ही. रमणी पॅटर्न राबविणे तसेच राज्यातील दूध आणि दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविषयी आयोजित संयुक्त बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा अत्राम, माजी आमदार सुरेश धस यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. चहल, दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, अन्न व औषश प्रशासन विभागाचे सचिव दिनेश वाघमारे, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, तसेच केंद्रीय एफएसएसएआयचे अधिकारी उपस्थित होते.

अन्न पदार्थातील भेसळ ही गंभीर बाब आहे. यामुळे विशेषतः लहान मुलांच्या आरोग्यवर गंभीर दुष्परिणाम होतो. आपल्या भावी पिढीचेही नुकसान होणार आहे. कर्करोगांसारखा दुर्धर आजारही अनेकांना जडतो. त्यामुळे भेसळखोरांवर एमपीडीएपेक्षांही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अन्न पदार्थातील भेसळ व दूध तसेच दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविरोधात केंद्र आणि राज्य शासनाच्या दोन्ही यंत्रणांनी प्रभावीपणे कारवाईसाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा, मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यासाठी दोन्ही विभागांना सहकार्य केले जाईल”, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.



मुख्यमंत्र्यांचे महत्त्वाचे निर्देश

“अद्ययावत प्रयोगशाळा, उपकरणे, मोबाईल प्रयोगशाळा यांसाठी केंद्राकडे पाठपुरावा केला जाईल. दुधातील भेसळीचा दूध उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसतो. त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर दूरगामी दुष्परिणाम देखील होतात. हे अत्यंत चिंताजनक असून, याला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. तातडीची उपाय योनजा म्हणून या दोन्ही विभागांनी संयुक्त मोहीमा आखाव्यात. त्यासाठी गृह विभागही सहकार्य करेल. दुधातील भेसळीविरोधात राज्याचा स्वतंत्र कायदा करण्यासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाने कार्यवाही करावी”, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीत माजी आमदार सुरेश धस यांनी काही समाजकंटकांमुळे दूध भेसळ उघडकीस आली की त्याचा दूध विक्रीवर परिणाम होतो, त्याचा फटका अंतिमतः दूध उत्पादक शेतकऱ्यांना बसत असल्याचे सांगितले.

शालेय शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न...

राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठीचा व्ही. रमणी पॅटर्न राबविण्याबाबतही चर्चा झाली. शालेय शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी राज्याचा शालेय शिक्षण विभाग एआयच्या वापरांसह विविधस्तरीय उपाययोजना करत आहे. त्यांच्याशी छत्रपती संभाजीनगरचे तत्कालिन आयुक्त व्ही. रमणी यांनी राबविलेल्या पॅटर्नची सांगड घालण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. हा पॅटर्न जिल्हा परिषदांबरोबरच, राज्यातील महानगरपालिकांच्या शाळांत राबवण्यात येईल, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# महाविकास आघाडीने शेकापच्या भाई ॲड.नारायण गोले पाटलांना उमेदवारी द्यावी भाई गणपतराव कोळपे

**माजलगाव प्रतिनिधी** बीड जिल्हा लाल बावट्याचा बालेकिल्ला म्हणून पूर्वी ओळखला जायचा याच बीड जिल्ह्याने सन १९६७ साली थोर स्वातंत्र्य सेनानी प्रति सरकारचे संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांना लोकसभेत पाठवले, त्यानंतर स्वातंत्र्यसेनानी माजी खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी देखील जिल्ह्याचे नेतृत्व केले, त्यानंतर गेवराईतून माजी आमदार भाई पवार, चौसाळा मतदारसंघातून माजी आ. भाई जनार्दन तुपे तर बीड विधानसभेत माजी आ.कॉम्रेड काशिनाथराव जाधव यांच्यासह अनेक लालबावट्याचे आमदारही निवडून आले, त्यामुळे बीड जिल्हा लालबावट्याचा बालेकिल्ला समजला जात असे, सन २००४ साली शेकापच्या भाई थावरेंनी याच मतदारसंघात तब्बल ३५ हजार मते मिळवली होती. तर माजलगाव मतदार संघात चौसाळा मतदार संघातील वडवणी व धारूर तालुक्याचा समावेश झालेला असल्याने वडवणी, धारूर या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मानणारा खूप मोठा वर्ग आहे. माजलगाव मतदार संघात २०१९ साल च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस,शेतकरी कामगार पक्ष आघाडीच्या आ.प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनतेने शरदचंद्रजी पवार साहेब आणि पुरोगामी विचाराचे प्रतिनिधी म्हणून विजयी केले परंतु त्यानंतर आ.प्रकाश सोळंके यांनी अवघ्या काही तासात पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा दर्शवून भारतीय जनता पक्षाला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन माजलगाव मतदार संघातील जनतेचा विश्वासघात केला होता, पुढे ईडीच्या भीतीमुळे अजित पवार यांनी भाजप सोबत जाण्याचा घेतलेल्या निर्णयाला संमती दर्शवत आ. प्रकाश सोळंके हे भाजप सोबत गेलेल्या राष्ट्रवादीच्या गटात ईडीच्या भीतीपोटी सामील झाले, केवळ सत्तेचा माग धरून काम करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेला वाऱ्यावर सोडण्याचे पाप केले,परंतु माजलगाव मतदार संघात शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचे लढाऊ नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी आपल्या आक्रमक भूमिकेने अनेक मोर्चे , आंदोलने करून प्रशासनासह शासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत, शेतकऱ्यांची खते बी बियाण्या मध्ये



होणारी लूट, प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांकडून होणारी लूट थांबवण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा माजलगाव विधानसभेचा आश्वासक चेहरा म्हणून जनसामान्यात, शेतकऱ्यांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा असून सत्तेसाठी नाही तर सत्यासाठी लढणारे धडाडीचे नेते म्हणून त्यांची ओळख सबंध मतदार संघात आहे, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक प्रस्थापित राजकीय नेते विविध राजकीय पक्षाची उंबरठे झिजवत असताना प्रमाणिकपणे चळवळीत काम करणारा, धाडसी कार्यकर्ता म्हणून भाई ॲड. नारायण गोले पाटील यांची वेगळी ओळख आहे, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील सर्व प्रस्थापित पुढारी भाजपच्या बाजूने असताना, महाविकास आघाडीच्या खा.बजरंग बप्पा सोनवणे यांना माजलगाव मतदार संघातून चांगले मताधिक्य मिळवून देण्यासाठी गावा- गावात-वाडी-वस्तीत जाऊन केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा पर्दापाश करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच आगामी काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी तसेच माजलगाव मतदार संघातील शेकडो प्रलंबित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासारख्या तरुण तडफदार, प्रमाणिक नेतृत्वाची गरज आहे त्यामूळे महाविकास आघाडीचे नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. उद्धवजी ठाकरे साहेब, मा. नाना पटोले साहेब, भाई जयंत पाटील साहेब यांनी भाई ॲड. नारायण गोले पाटील यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातील लढवय्या नेत्यास माजलगाव विधानसभेची उमेदवारी द्यावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाई गणपतराव कोळपे यांनी केले असून लवकरच शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई जयंत पाटील यांना भाई मोहन गुंड यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ भेटून मागणी करणार आहे तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड व माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ यांची महाविकास आघाडीने शेतकरी कामगार पक्षाला माजलगाव मतदार संघ सोडण्याबाबत संयुक्त बैठक होणार असल्याची माहिती भाई गणपतराव कोळपे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# नीती आयोग समितीची बैठक २ ऑगस्ट ला नाशिक मध्ये

**नाशिक/ सुरेश इंगळे**

देशाचे पंचवार्षिक धोरण ठरविण्यात महत्त्वाची भूमिका निभवणाऱ्या नीती आयोग पश्चिम विभागीय समितीची बैठक 2 ऑगस्ट रोजी नाशिक येथे होत आहे. या समितीचे पदसिद्ध अध्यक्षाची भूमिका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे भूषवणार असून त्यांच्यासह सचिव स्तरावरील सुमारे 80 अधिकारी बैठकीत उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे अशा स्वरूपाची राष्ट्रीय स्तरावरील समिती नाशिक मध्ये येण्याची ही पहिलीच वेळ आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यांना सशक्त करण्यासाठी आणि केंद्र व राज्यांमधील धोरणात्मक आराखड्यांची अधिक चांगली समज वाढविण्यासाठी सहकार्य संघराज्यावर भर देणार आहेत. त्यांनी तंटे सोडविण्यासाठी आणि सहकारी संघराज्यांना चालना देण्यासाठी या झोनल कौन्सिलच्या बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीसाठी जवळपास 80 मुख्य सचिव, प्रधान सचिव उपस्थित राहण्याचे बोलले जात आहे. विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम व जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ हे या बैठकीचे सूक्ष्म नियोजन करणार आहेत. या बैठकीला मुख्यमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, आणि सदस्य, राज्य आणि केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. महिला व बालकावरील लैंगिक गुन्ह्याचा आणि बलात्काराच्या प्रकरणाचा जलद तपास, बलात्कार आणि पांक्सो कायद्यातील खटल्यांचा निपटारा करण्यासाठी जलद गती विशेष न्यायालयाच्या योजनेची अंमलबजावणी तसेच सर्वसामान्यांच्या समस्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. रस्ते जोडणी, वीज उद्योग आणि इतर बाबींचा यामध्ये समावेश असेल. प्रत्येक गावात पाच किलोमीटरच्या आत बँका आणि इंडिया पोस्ट पेमेंट, बँकेच्या शाखांची सुविधा ,पोषण अभियानाद्वारे मुलांमधील कुपोषण दूर करणे, शाळेतील मुलांचे गळतीचे प्रमाण कमी करणे, आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत सरकारी रुग्णालयाचा सहभाग आणि सर्वसामान्यांच्या हिताचे मुद्दे, यावर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य सहसचिव डॉ.अशोक शिरसाट यांची बाबा ही कविता अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

**बीड/प्रतिनिधी**



शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन चे महाराष्ट्र राज्य सहसचिव तथा अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक कवी डॉ. अशोक शिरसाट यांची बाबा ही कविता संत गाडगेबाबा विद्यापीठ,अमरावती विद्या पीठाच्या बी.ए. पार्ट 3 ला मराठी विषयाच्या पाठ्य पुस्तकात समाविष्ट करण्यात आली. अकोला जिल्ह्यातील देगाव या छोट्याशा खेड्यातील रहिवासी सध्या अकोला येथे वास्तव्यास असलेले सुप्रसिद्ध साहित्यिक कवी डॉ. अशोक शिरसाट यांची 'उधाण ' 1998 या काव्यसंग्रहातून बाबा ही कविता नुकतेच संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावतीच्या बी.ए. भाग 3 च्या मराठी पाठ्यपुस्तकात सन दोन हजार चोवीस पंचवीस करिता समाविष्ट करण्यात आलेली आहे. ते पनवेल येथे आयटीआय इन्स्ट्रक्टर म्हणून तीन वर्षांपूर्वी निवृत्त झालेले आहेत सध्या ते अकोला येथे रहिवासी असून लेखनासोबतच त्यांचे सामाजिक कार्य सुद्धा कौतुकास्पद आहे त्याबद्दल शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी डॉ. अशोक शिरसाट यांचे अभिनंदन केलेले आहे तसेच सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# जालना शहरातील दुचाकी चोरणा-या २ आरोपींना जेरबंद करुन १६ दुचाकी केल्या जप्त


## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना/प्रतिनिधी**

जालना शहर व हसनाबाद पोलिस ठाणे अंतर्गत दुचाकी चोरणा-या २ जेरबंद करुन १६ दुचाकी केल्या जप्त करण्यात आल्या माहिती शुक्रवारी समोर आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ही कारवाई केली. यासंदर्भात पोलिसांनी सांगितले की जालना जिल्ह्यामध्ये दुचाकी चोरांचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक, जालना व अपर पोलीस अधिक्षक, जालना यांनी स्थानिक गुन्हे शाखेस सुचना दिल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी दुचाकी चोरांसाठी विशेष पथक तयार करुन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या. दिनांक २६/०७/२०२४ रोजी जालना शहरामध्ये इसम नामे सय्यद अल्ताफ सय्यद अहमद (वय-२१ वर्ष, रा. नॅशनलनगर, जालना) हा त्याच्या साथीदारांसोबत मोटार सायकल चोरी करीत असल्याची माहिती गुप्तबातमीदारामार्फत मिळाल्याने त्याचा विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर रोड, जालना येथे शोध घेतला असता तो मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली व गुन्हा करण्यासाठी त्याचा मित्र नामे महंमद फिरोज ऊर्फ बब्बी कलीमोद्दीन (वय- 19 वर्ष, रा. कुचरवटा, जालना) व एक विधीसंघर्षग्रस्त बालक अशांनी



मिळून जालना शहरातील मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले. त्यानुसार महंमद फिरोज ऊर्फ बब्बी कलीमोद्दीन (वय 19 वर्ष, रा. कुचरवटा, जालना) व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता गुन्ह्यातील विधी संघर्षग्रस्त बालकाने जालना शहरातील विविध ठिकाणाहून मोटार सायकल चोरी करुन आरोपी नामे सय्यद अल्ताफ सय्यद अहमद व महंमद फिरोज ऊर्फ बब्बी कलीमोद्दीन यांना विक्रीकामी आणून दिल्या. सदरच्या मोटार सायकली फायनान्स कंपनीने ओढून आणलेल्या असल्याचे भासवून जालना शहरातील नागरिकांना मोटार सायकल विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे ज्यांना मोटार सायकल विक्री केल्या त्या इसमांकडून १६ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपीतांनी १६ मोटार सायकल सदर बाजार, चंदनझिरा, कदीम जालना, तालुका जालना व हसनाबाद पोलीस ठाणे हद्दीतून चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ, पोनि. सय्यद मजहर, सपोनि योगेश उबाळे, सपोनि. शांतीलाल चव्हाण, पोलिस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, प्रशांत लोखंडे, सतिष श्रीवास, अक्रूर धांडगे, धीरज भोसले सर्व स्थागुशा, जालना यांनी केली.



मुसळधार पावसामुळे धोक्कादायक इमारतीतील रहिवाशांचे जीव धोक्यात आले आहेत. नवी मुंबईत एक तीन मजली इमारत कोसळली आहे. इंदिरा निवास असे या इमारतीचे नाव आहे. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली काही रहिवाशी अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. वेळवरच बचाव पथक दाखल झाले आहे. बचाव पथकाने अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरु केले आहे.

# कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची अत्यंत दुरावस्था; नागरिकांचे हाल!

गेवराई | प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील कोमलवाडी ते भोजगाव रस्त्याची पावसाळ्यात दुरवस्था झाली आहे. ४ किलोमीट अंतराचा रस्ता हा जीवघेणा बनला असून पावसामुळे रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मार्गक्रमण करावे लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या या प्रमुख रस्त्याकडे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांनी ताबडतोब लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित आहे. कोमलवाडी व भोजगाव ही ग्रुप ग्रामपंचायत असून या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या कसरतीने या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामपंचायत भोजगाव येथे असल्यामुळे ग्रामस्थांना त्याठिकाणी जावं लागतं, सध्या पावसाळा सुरू असल्याने हा चार किलोमीटर अंतराचा रस्ता चिखलमय होऊन रस्त्यात खड्डेच खड्डे



पडले असून वाहने चालवणे जिकिरीचे बनले आहे. तसेच नागरिकांना चिखलातून पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. दळणवळणासाठी कोमलवाडी ते भोजगाव हा प्रमुख रस्ता असल्यामुळे येथील नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते, ग्रामपंचायतीच्या कामासाठी, उमापूर येथील बॅंकेच्या कामासाठी, शेतात जाण्यासाठी तसेच इत्यादी महत्वपूर्ण कामासाठी कोमलवाडी येथील कोमलवाडी येथील नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करावी लागते. पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडले असून ते खड्डे चुकविण्याच्या नादात तसेच गाडी घसरून अनेकवेळा नागरिक पडत आहेत. शेतकऱ्यांना, महिलांना या रस्त्यावरून दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीववित्वाला धोका निर्माण झाला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077